
WELCOME



**Subject :- Economy (अर्थशास्त्र )**

By
**Dr. Pandit Mule**
**Dept. of Economy**
**Kalikadevi College, Shirur (ka.)Dist.Beed**

## ४.३.१ हरितक्रांतीचे यश (Achievements of Green Revolution)

### १. रोजगाराला चालना

हरित क्रांतीमुळे सिंचन क्षमता वाढून संकरित बी-बियाणांच्या क्रांती… एका वर्षात २-३ पिके घेणे शक्य झाले. बागायती क्षेत्रात भाजीपाला, फळ… उत्पादन घेतले गेल्याने मजूरांना अधिक रोजगारांच्या सोयी निर्माण झा… कालांतराने त्यांचे वेतन वाढून त्याच्या राहणीमानात बदल झाला. २०११-१… मध्ये २८ टक्के लोकांना शेती क्षेत्रातून रोजगार प्राप्त झाला.

### २. शेती उत्पादनात वाढ

देशात सधन कृषी (Intensive Agriculture) उत्पादन संस्थेचा विका… होऊन कृषी उत्पादन व उत्पादकता वाढून देशाचा अन्न धान्याबाबत स्वयंपूर्णते… मार्ग सुकर झाला. या हरित क्रांतीने नव-नवीन तंत्रज्ञान, आधुनिक अवजा…

संकरित बियाणे, रासायनिक खते, जंतु नाशकांचा वापर वाढल्याने तसेच शेतीत एकापेक्षा अधिक पिके घेता आल्याने श्रमिकांची मागणी वाढली व ग्रामीण भागात अधिक रोजगार पुरवठा होण्यास मदत झाली. राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा २०१२-१३ मध्ये १४.०२ टक्के इतका होता. अन्नधान्य उत्पादनातील वाढ तक्ता ४.३ मध्ये दर्शविलेली आहे.

### तक्ता ४.३: अन्नधान्य उत्पादनातील वाढ

(किलोग्रॅम/ हेक्टरी)

| प्रकार | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २००९-१० | २०११-१२ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तांदूळ | १०१३ | ११२३ | १३३६ | १७४० | १००१ | २१३० | २३७२ |
| गहू | ८५१ | १३०७ | १६३० | २२८१ | २७०८ | २८३० | ३१४० |
| मका | ९२६ | १२७९ | ११५९ | १५८१ | १८२२ | २००२ | २४७६ |
| बाजरी | २८६ | ६२२ | ४५८ | ६५८ | ६८८ | ७२८ | ११५६ |
| डाळी | ५३९ | ५२४ | ४७३ | ५७८ | ५४४ | ६२५ | ६९४ |
| एकूण अन्नधान्ये | ७१० | ८२४ | १०२३ | १०८० | १६२६ | १७९६ | २०५९ |

स्रोत: Directorate of Economics and Statistics Department of Agriuclture and Co-operation Economic Survey -2012-13

तक्ता ४.३ मध्ये हरितक्रांतीच्या प्रभावामुळे शेतीक्षेत्रातील उत्पादनात एकूण अन्नधान्याचे उत्पादन १९६०-६१ ते २०००-०१ या कालावधीत ७१० किलोग्रॅम वरून (हेक्टरी, १६२६ किलोग्रॅम पर्यंत वाढले. या कालावधीत लोकसंख्येत वेगाने वाढ होऊन ही मोठ्या प्रमाणात अन्नधान्य टंचाईची परिस्थिती निर्माण झाली नाही.

देशातील तांदूळाचे उत्पादन ही १९६०-६१ मध्ये १०१३ किलोग्रॅम (हेक्टरी) होते त्यात वाढ होऊन २०११-१२ मध्ये ते २३७२ किलोग्रॅम (हेक्टरी) इतकी विक्रमी वाढ झाल्याचे दिसून येते तसेच गव्हाच्या उत्पादनात ही १९६०-६१ मध्ये ८५१ किलोग्रॅम (हेक्टरी), २०००-०१मध्ये२७०८ किलोग्रॅम (हेक्टरी) आणि २०११-१२ मध्ये ते ३१४०किलोग्रॅम (हेक्टरी) पर्यंत वाढले.

याचाच अर्थ असा की हरितक्रांतीमुळे मोठ्या प्रमाणात उत्पादनात वाढ होण्यास मदत झाली व लोकांच्या अन्नविषयक गरजा भागविण्यासाठी देश काही प्रमाणात सक्षम होण्यास मदत झाली.

### ३. शेतीचे व्यापारीकरण

हरितक्रांतीच्या महत्तम प्रयत्नामुळे पारंपारिक शेतीचे भांडवलप्रधान शेतीत रूपांतर झाले. जे शेतकरी भांडवलाची मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली ते नवीन तंत्राचा वापर करून उत्पादनात वाढ करू शकले. त्यांना या हरितक्रांतीचा लाभ मोठ्या प्रमाणात झाला. गरीब व लहान शेतकरी केवळ भांडवलाअभावी नवीन तंत्रज्ञान स्विकारू शकले नाहीत. अशा शेतकऱ्यांना हरितक्रांतीचा लाभ झाला नाही. त्यामुळे ग्रामीण भागात आज ही विषमता आहे. २०१०-११ मध्ये एकूण उत्पादनात २१८ मिलियन टन इतकी वाढ झाली.

तक्ता ४.४ मध्ये भारतातील नगदी पिकांचे उत्पादन दर्शविलेले आहे.

**तक्ता ४.४ : भारतातील नगदी पिकांचे उत्पादन**

| प्रकार | १९६०-६१ | १९९०-९१ | १९९९-२००० | २००१-०२ | २००४-०५ | २०१२-१३ |
|---|---|---|---|---|---|---|
| ऊस (द.ल.टन) | ११० | २५४ | २९९ | ३०० | २३२ | ३३४.५ |
| कापूस(द.ल.गाठी) | ६ | १० | १२ | १० | १७ | ३३.८ |
| ताग (द.ल.गाठी) | ४ | ८ | १० | १२ | ११ | १०.६ |
| तेलबिया (द.ल.टन) | ७ | १९ | २१ | २१ | २६ | २९.५ |
| बटाटा (द.ल.टन) | ३ | १५ | २४ | २२ | २३ | २९ |

स्त्रोत : Directorate of Economics and Statistics, Department of Agriculture and Co-operation

तक्ता ४.४ वरून असे दिसून येते की, नगदी पिकांमध्ये ऊसाचे उत्पादन १९६०-६१ मध्ये ११० दशलक्षटन होते. २००४-०५ मध्ये २३२ दशलक्ष टनापर्यंत वाढले आणि २०१२-१३ मध्ये ३३४.५ दशलक्ष टनापर्यंत वाढले. तसेच कापसाच्या उत्पादनातही विक्रमी वाढ होऊन ते उत्पादन १९६०-६१मध्ये ६ दशलक्ष गाठी होते. त्यात वाढ होऊन ते २०१२-१३ मध्ये ३३.८ दशलक्ष गाठी इतके झाले. तागाचे उत्पादन ही १९६०-६१ मध्ये ४ दशलक्ष गाठी होते. त्यात वाढ होऊन ते २०१२-१३ मध्ये १०.६ दशलक्ष गाठी एवढे झाले. तेलबियांचे ही उत्पादन १९६०-६१ मध्ये ७ दशलक्ष टन होते. २०१२-१३ मध्ये २९.५ दशलक्ष टन इतके झाले. बटाट्याचे उत्पादन ही १९६०-६१ मध्ये ३ दशलक्ष टनापर्यंत होते. त्यात सातत्याने मोठ्या प्रमाणात वाढ होऊन २०१२-१३ मध्ये ते २९ दशलक्ष टनापर्यंत वाढले.

नगदी पिकांच्या उत्पादनात वाढ होऊन त्याचा अनिश्चित फायदा मुख्यत: वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागविण्यासाठी झाला. यावरून असे दिसून येते की, बटाटा पिकांच्या उत्पादनात विक्रमी वाढ झाली. मात्र ऊस, कापूस, ताग आणि तेलबियांच्या उत्पादनातील वाढ ही समाधानकारक असल्याचे दिसून येत नाही.

### ४. शेतीच्या किंमतीत स्थैर्यता

हरितक्रांती झाल्याने अन्न धान्य व इतर शेतमालाचे उत्पादन वाढल्याने देशात अन्नधान्याचा साठा वाढला त्यामुळे दुष्काळग्रस्त भागात अन्नधान्याचा पुरवठा करणे सहज शक्य झाले.

## ५. आर्थिक विकासाला मदत

हरितक्रांती झाल्यामुळे अन्नधान्याच्या उत्पादनाबरोबरच कच्च्या मालाचे उत्पादनात वाढ झाली. त्यामुळे देशातील कापड, ताग, साखर, तेल गिरण्या यांना अधिक कच्चा माल पुरवून उद्योगाचा ही विकास झाला. हरितक्रांतीने शेतीला आधुनिकता प्राप्त झाली. शेतकऱ्याची आर्थिक स्थिती सुधारण्याने ट्रॅक्टर, कीटकनाशके, इलेक्ट्रिक मोटार, रासायनिक खते, औषध फवारणी तंत्रे यांची मागणी वाढून भांडवली उद्योगाचा विकास झाला. या हरितक्रांतीने शेती व उद्योगामुळे backward linkages बरोबरच forward linkages यांना बळकटी प्राप्त झाली. २०११-१२ मध्ये आर्थिक विकासाचा दर ८.२ टक्के इतका दिसून आला.

६. गुंतवणुकीत वाढ

हरितक्रांतीमुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली अधिक उत्पन्न प्राप्तीमुळे शेती क्षेत्रात गुंतवणूक करण्याची प्रेरणा मिळाली. विहिर खोदणे, पाईप लाईन खोदणे, ट्रॅक्टरसारखी शेती अवजारे खरेदी करणे, जमिनीचे सपाटीकरण करणे इत्यादी क्षेत्रात भांडवल गुंतवणूक वाढली. या गुंतवणूकीने शेतीच्या उत्पादनात वाढ झाली.

**७. कृषी उद्योगाला चालना**

हरितक्रांतीने अन्नधान्य उत्पादनाबरोबरच ऊस, कापूस, ताग व तेलबिया यांच्या उत्पादनात वाढ झाल्याने साखर, ताग उद्योग, कापड, तेल व वनस्पती तूप इत्यादी उद्योगांना कृषी क्षेत्रातून पुरेशा प्रमाणात कच्चा माल पुरवून कृषी उद्योगाच्या विकास होण्यास मदत झाली. त्यामुळे आधुनिक अवजारे, कीटकनाशके,


Thank you!